नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/१२/२०२५ (बुधवार )**

---

## मोबाईल शोध बाबत विशेष मोहीम राबवुन नागपुर ग्रामीण जिल्हयातील हरविलेले/गहाळ झालेले आणि चोरी गेलेले ४७० मोबाईलचा शोध घेवुन त्यांचे मुळ मालकांना परत देण्यात आले २ लाख रूपयांचा मुद्देमाल हस्तगत

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत मागील काही महीन्यात हरविलेले/गहाळ झालेले व चोरी गेलेल्या मोबाईलचा शोध घेणे कामी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात डिसेंबर २०२५ मध्ये विशेष मोहीम राबविण्यात आली.** नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन यांनी सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मदतीने तांत्रीक पदधतीने शोध घेवून CEIR पोर्टलचा वापर करुन ४७० मोबाईलचा शोध घेतला. दिनांक ३१/१२/२०५ रोजी मिळुन आलेले ४७० मोबाईल संबधीत उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या हस्ते त्याचे मुळ मालकांना परत केले.

सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर, कळमेश्वर, खापा आणि केळवद येथील एकुण १४७ मोबाईल श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या हस्ते मुळ मालकांना परत करण्यात आले. रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक, पारशिवणी, देवलापार आणि अरोली येथील एकुण १२६ मोबाईल श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या हस्ते मुळ मालकांना परत करण्यात आले. उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड, कुही, भिवापुर आणि वेलतुर येथील एकुण १०७ मोबाईल श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या हस्ते मुळ मालकांना परत करण्यात आले. काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल, नरखेड,

कोंढाळी, जलालखेडा येथील एकुण २१ मोबाईल श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या हस्ते मुळ मालकांना परत करण्यात आले. नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी, एमआयडीसी बोरी आणि बेला येथील एकुण ४४ मोबाईल श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांच्या हस्ते मुळ मालकांना परत करण्यात आले. कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन मौदा आणि कन्हान येथील एकुण २५ मोबाईल श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या हस्ते मुळ मालकांना परत करण्यात आले. **नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत मोबाईल शोध बाबत विशेष मोहीम राबवुन पोलीसांनी ४७० मोबाईल किंमती अंदाजे २ लाख रूपये त्यांच्या मुळ मालकाला परत केले आहे.**

**नागपुर ग्रामीण पोलीसांकडुन नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी त्यांचा मोबाईल गहाळ झाल्या नंतर किंवा चोरीस गेल्यानंतर त्याची माहीती तात्काळ पोलीसांना द्यावी तसेच त्याबाबतची माहीती https://www.ceir.gov.in या पोर्टलवर माहीती भरून तक्रार नोंद करावी. त्यामुळे गहाळ झालेले किंवा चोरीस गेलेले मोबाईलचा तांत्रीक पदधतीने शोध घेता येईल.**




उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय
रामटेक विभाग, जि. नागपूर (ग्रा.)
फोन नं. 07114/2256428






च्याकडे..!
तुमचा...!
– स्थळ –
उपविभाग, काटोल
नागपूर ग्रामिण




## पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २ गुन्हे नोंद

**पोस्टे उमरेड :—** दिनांक ३०/१२/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा कावरापेठ, उमरेड येथे **महीला आरोपी ही** आपले दुकानात प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि आरोपीच्या दुकानाची पंचासमक्ष घरझडती घेतली असता नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीमध्ये गुंडाळलेला मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून गोल्ड कंपनीचा एकुण ०६ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ६,०००/— रूपये असा एकुण ६,०००/— रूपयाचा मुद्‌देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

**पोस्टे कळमेश्वर :—** दिनांक ३०/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, वार्ड क्र. ११, मरडवार लेआउट ता. कळमेश्वर येथे **सुभाष कृष्णराव कुबडे, वय ५१ वर्ष, रा. कळमेश्वर, वार्ड क्र ११, मरडवार**

**लेआउट, ता. कळमेश्वर जि. नागपुर** हा नायलॉन मांजा स्वत: जवळ बाळगुन बायपास रोडनी मंडलीक यांचे वेल्डींगच्या दुकानाजवळ विक्री करिता येणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस पथकाने तात्काळ सापळा रचत कारवाई केली आणि आरोपीची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता आरोपी कडे असलेल्या थैली मध्ये नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीमध्ये गुंडाळलेला मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून एकुण ०५ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ६८००/— रूपये असा एकुण ६८००/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १२५, २२३ भा.न्या. सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ३०/१२/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा दहेगाव येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौदा पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) सुरेंन्द्र क्रिष्णा आंबिलडुके, वय ३७ वर्ष, २) रामदास महादेव आंबिलडुके, वय ५८ वर्ष, ३) संजय संतोष सोमनाथे, वय ४२ वर्ष, ४) अनिल शिवदास आंबिलडुके, वय ४६ वर्ष, ५) हरिचंद्र दामाजी आंबिलडुके, वय ४५ वर्ष, ६) दिलीप रामराव आंबिलडुके, वय ३८ वर्ष, ७) जगदीश बालचंद हटवार, वय ४० वर्ष, सर्व रा. दहेगाव, ता. मौदा ८) कुंदन कंठिराम आंबिलडुके, वय ३० वर्ष, ९) सुजित टोलीराम निमजे, वय ३६ वर्ष, सर्व रा. धानला** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून **५२ तास पत्ते व नगदी २९२०/— रूपये असा एकुण २९७०/— रूपयाचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ९ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन मौदा **येथे कलम १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## हद्‌दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक ३०/१२/२०२५ रोजी खापा पोलीसांना हद्दपार इसम नामे **दादाराव सुभाष हरकरे, वय ३८ वर्ष, रा. कोथुळणा ता. सावनेर** हा खापा येथे मिळुन आला. खापा पोलीसांनी हद्‌दपार आरोपी **दादाराव सुभाष हरकरे याला** नागपुर जिल्हयात येण्याच्या परवानगी बाबत विचारणा केली असता नमुद आरोपीने कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता हद्‌दपार आदेशाचे उल्लंघन करून नागपुर जिल्हयात प्रवेश केला असल्याचे निष्पन्न झाले. नमुद आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन खापा येथे कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हे नोंद केला आहे.

## जलालखेडा पोलीस ठाणे येथील दाखल गुन्ह्यातील माहितीबाबत.

दि.३०/१२/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात दिंदरगाव मारहाण प्रकरणात, बिट जमादाराला अटक नाही या शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर प्रकरणातील सविस्तर माहीती अशी आहे की,  जलालखेडा पोलीस स्टेशन येथे तकारदार नामे गंगाधर महादेवराव सरदार, रा. दिंदरगाव, ता. नरखेड यांनी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे नेमणुकीस असलेले सहायक फौजदार पुरूषोत्तम देविदास धोंडे, ब.नं. ३२२ यांनी तक्रारदार यांचे अल्पवयीन मुलांना मारहाण केलेबाबत पोलीस ठाणे जलालखेडा येथे तकार दिली. सदर सदर प्रकरणी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे अपराध कमांक ६५९/२०२५ कलम ११८(१), १२०(१), ११५(२) भारतीय न्याय संहींता सहकलम ७५ बाल व मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम सहकलम ३ (२) (Va), २ (Vii) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास श्री. पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी हे करीत आहे.

सदर गुन्ह्यात ७ वर्षापेक्षा कमी शिक्षा असल्याने तसेच सदर गुन्हा जामीनपात्र असल्याने अर्नेश कुमार विरूद्ध स्टेट ऑफ बिहार २०१४ केसमधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिलेल्या निर्देशानुसार नमुद गुन्ह्यातील आरोपी सहायक फौजदार पुरूषोत्तम देविदास धोंडे ब.नं.३२२ यांना कलम ३५ (३) भारतीय नागरीक सुरक्षा संहीता अन्वये कायदेशीर नोटीस देण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा सविस्तर तपास सुरू आहे.

# नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे दिनांक २४/१२/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ रोजीपर्यंत राबविण्यात येत आहे ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह अवैध दारू बाबत विशेष मोहीम

## विशेष मोहीमे अंतर्गत करण्यात आल्या मोटर वाहन अधिनियम अन्वये १७० कारवाई आणि अवैध दारू बाबत १८ गुन्हे दाखल

**नविन वर्षानिमीत्त नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विशेष मोहीमे अंतर्गत दिनांक ३०/१२/२०२५ रोजी मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह च्या ३३ कारवाई, तसेच विना हेल्मेट, विना परवाना, ओव्हर स्पीडच्या आणि इतर १३७ कारवाई अशा एकुण १७० कारवाई केल्या आहे.**

त्याचप्रमाणे सदर विशेष मोहीमे अंतर्गत दिनांक ३०/१२/२०२५ रोजी अवैध दारू विक्रेते, दारू काढणारे तसेच सेवन कारणाऱ्यांवर कारवाई करत महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये विविध पोलीस स्टेशन अंतर्गत **एकुण १८ गुन्हे नोंद** करण्यात आले असुन सदर कारवाईत ९९०० मिली देशी दारु, २६६१० मिली विदेशी दारू, ११९ लीटर मोहाफुल दारू असा **एकुण ५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल** जप्त करून **एकुण १८ आरोपी** यांविरूद्ध गुन्हे नोंद करण्यात आलेले आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.

**मद्यप्राशन करून वाहन चालवितांना चालक मिळून आल्यास त्यांच्यावर मोटार वाहन कायदया अन्वये कारवाई करण्यात येईल सदर प्रकरणात मा न्यायालयाकडुन १०,०००/— रूपयांपर्यंत दंड होवु शकतो. नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे संपुर्ण जिल्हयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नववर्ष, तसेच इतर सणोत्सव आनंदात साजरा करावा परंतु स्वसुरक्षा म्हणुन वाहन चालवितांना मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, हेल्मेट चा वापर करावा, वाहतुक नियमांचे पालन करावे. तसेच पालकांनी त्यांच्या अल्पवयीन पाल्यांना दुचाकी मोसा/चारचाकी वाहन चालविण्यास देवू नये अन्यथा चालकांविरूद्ध मोटार वाहन कायदयांन्वये गुन्हे दाखल करून कायदेशिर कारवाई करण्यात येईल.**

# एमआयडीसी बोरी हद्‌दीतील प्राणांतिक अपघात

दिनांक २९/१२/२०२५ रोजी नांदेड येथून गॅलसी ट्रॅव्हल्स कंमाक एम.एच ४० बी.एफ ४०९३ चा चालक नामे चंद्रशेखर बन्सीलाल शेन्डे हा प्रवासी लोंकाना बस मध्ये बसून नांदेड हून नागपूर कडे येत असताना पहाटे ०५/०० वा. सुमारास पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्‌दीत नागपूर वर्धा महामार्गवरील मौजा मोरझरी शिवारातील काठीयावाडी धाब्या जवळ रोड वर नागपूर दिशेने उभा असलेला ट्रक कंमाक एम.एच ४९ बी.झेड ५७८४ हा बंद स्थितीत रोड वर सुरक्षीत बॅरीकेंटीग व दिशानिर्देश चिन्हाकींत करून रोड चे कडेला उभा असतांना ट्रॅव्हल्सचा चालकाने आपले ताब्यातील ट्रॅव्हल्सने ट्रक चे मागील भागास जोराने धडक दिल्याने रोड अपघात होवून अपघातात २४ प्रवासी जखमी झाले असून रोड अपघातात ट्रॅव्हल्स वाहक नामे अभिषेक किशोरराव ठाकरे, वय ३० वर्षे, रा. पोद्यार शास्त्री चौक, वर्धा हा उपचारा दरम्यान मरण पावला आहे. सदर प्रकरणात पोलीस स्टेशन, एमआयडीसी बोरी येथे आरोपी ट्रॅव्हल्स चालक चंद्रशेखर बन्सीलाल शेन्डे रा. सुराबर्डी वारेकरनगर अमरावती नागपूर याचेवर कलम २८१,१०६ (१), १२५ (ब), १२५ (अ) भान्यासं सहकलम १८४, १७७ मोटार वाहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास एमआयडीसी बोरी पोलीस करीत आहेत.

मा. पोलीस अधिक्षक  
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर  
यांच्या मान्यतेने